# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,जळगाव

महाराष्ट्र शासनाची स्वायत्त तथा नॅक प्रमाणित संस्था
राष्ट्रीय महामार्ग क्र.०६, जळगाव ४२५ ००२

दुरध्वनी क्र.०२५७-२२८१५२२ फॅक्स क्र.०२५७-२२८१३१९
Websit: www.gcoej.ac.in E-mail-princoej@rediffmail.com

जा.क्र.शाअमज/वि.वि./२०२०/ 2116 दिनांक: 11 DEC 2020

**विद्यार्थ्यासाठी महत्वाची सुचना**

विषय- दुष्काळग्रस्त परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत...

संदर्भ- १.शासन शुध्दीपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.३५३/तांशि-४ दिनांक-०१/१२/२०२०
२.संचालनालयाचे पत्र जा.क्र.२३अ/एडीएम/परीक्षाशुल्कमाफी/२०२०/३५१ दिनांक-०३/१२/२०२०
३.या कार्यालयाची सुचना जाक्र शाअमज/वि वि /२०२०/४२६ दिनांक-०६/०२/२०२०

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की,महसुल व वनविभागाच्या दिनांक १८.११.२०१९ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील ३४ जिल्हयातील ३२५ तालुक्यातील पिकांचे नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरीताचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत कळविलेले आहे.

आता संदर्भाधीन क्र.१ च्या शुध्दीपत्रकान्वये शासनाच्या परीपत्रकातील (सविस्तर माहितीसाठी संदर्भ क्र.१चे अवलोकन करावे ) राज्यातील ३४ जिल्हयातील ३२५ तालुक्यामधील या ऐवजी राज्यातील ३४ जिल्हयातील ३४९ तालुक्यामधील असे वाचण्यात यावे असे संचालनालयाच्या संदर्भ २ च्या पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे त्याअन्वये दुष्काळग्रस्त व अपादग्रस्त तालुक्यातील जे शेतकरी पाल्य विद्यार्थी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील विविध अभ्यासक्रमांकरीता चालू शैक्षणिक २०१९.२० वर्षात प्रवेशित असतील,अशा विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, जे विद्यार्थी खालील अटी व शर्ती पुर्ण करीत असतील, अशा आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील व जे कोणतीही शासकीय सवलतीद्वारे परीक्षा फी माफीचा लाभ घेत नाही अशा विद्यार्थ्यांनीच अर्जासह आवश्यक ती खालील कागदपत्रे जोडुन अर्ज दिनांक **१८/१२/२०२०** पर्यंत कार्यालयांत सादर करावेत.याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**तसेच यापुर्वी शैक्षणिक २०१९.२० मधे ज्या विद्यार्थ्यांनी या कार्यालयाच्या संदर्भ क्र ३ च्या सुचने नुसार उपरोक्त योजनेचा लाभ घेतलेला आहे, त्यांनी पुन्हा अर्ज करू नये.(ज्या विद्यार्थ्यांनी Summer-2020 ची परीक्षा फि भरलेली आहे असे विद्यार्थी वगळून )फक्त आणि फक्त नवीन वाढीव तालुक्यातील विद्यार्थ्यांनीच विहीत मुदतीत प्रत्यक्ष महाविद्यालयात हजर राहून अर्ज करावेत.**

अर्जासोबत आवश्यक कागदपत्र

१. नियमित अभ्यासक्रम व सत्र प्रवेश फि भरल्याची पावती व ओळखपत्र.
२. हॉल तिकीटाची छायांकीत प्रत व परीक्षा शुल्क भरल्याचा पुरावा (Winter2019 & Summer-2020)
३.पालक कायम रहात असलेला तालूका दुष्काळग्रस्त/अपादग्रस्त म्हणून घोषित केला असल्याचे प्रमाणपत्र
४.पालकांचे प्रत्यक्ष राहण्याचे ठिकाणाचा पुरावा (आधार कार्ड / मतदार ओळखपत्र).
५ पालकांचा सन २०१९-२० वार्षिक उत्पन्नाचा दाखला व ७/१२ चा उतारा
६. राजर्षी शाहुमहाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजने अंतर्गत अर्ज केलेला असल्यास अर्जाची प्रत.
७. परीक्षा शुल्क माफिची सवलत इतर शासकीय अधिकारी यांचे कडून प्राप्त न झाल्याबाबत विद्यार्थ्याचे हमीपत्र.

विद्यार्थ्याने विहीत वेळेत अचूक माहिती सादर करणे बंधनकारक असून चुकीची/ अपुर्ण माहिती असल्यास उपरोक्त परीक्षा शुल्क माफ केले जाणार नाही व अशा विद्यार्थ्यांवर दंडात्मक कार्यवाही केली जाईल,याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यायलय,जळगाव

प्रत- १. मुख्य सुचना फलक-कार्यालय,ग्रंथालय
२. शैक्षणिक अधिष्ठाता यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
३. रोखपाल यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
४. श्री. आर. एल. वाणी यांना संस्थेच्या संकेतस्थळावर अपलोड करणेसाठी.